
रवींद्रनाथ टागोर

सुनैना कोएल्हो यांची चित्रे


# ढग आणि लाटा



कथाचे ३००एम थिंकबुक



आई,
ढगात राहणारे लोक मला
बोलवत आहेत…



“ये!
आम्ही उठल्यापासून दिवस संपेपर्यंत खेळत असतो. आम्ही सोनेरी पहाटेशी खेळतो आणि रुपेरी चंद्राशीसुद्धा खेळतो.”

मी विचारते,
“पण, तुमच्यापर्यंत येऊ कशी?”



ते उत्तर देतात,
“पृथ्वीच्या कडेपाशी ये, या आकाशाच्या दिशेने
हात उंच कर आणि तुला वर ढगांमध्ये
उचलले जाईल.”

“आई माझी घरी वाट पाहत आहे.”, मी म्हणते,
“मी तिला सोडून कशी येऊ?”

मग ते हसतात आणि निघून जातात.




आई,
पण मला त्यापेक्षा छान खेळ माहीत आहे. मी होते ढग आणि तू हो चंद्र.

मी तुला दोन्ही हातांनी कव्हर करेन आणि आपल्या घराचे छत होईल निळे आकाश.



लाटांमध्ये राहणारे लोक मला बोलवत आहेत...
“आमच्यात ये! आम्ही सकाळपासून रात्रीपर्यंत गात
असतो; आम्ही सतत प्रवास करतो आणि
अपरिचित मार्गांवर जातो.”





मी विचारते,
"पण मी तुमच्यात येऊ कशी ?”

त्या म्हणतात,
“किनाऱ्याच्या कडेवर ये आणि डोळे गच्च मिटून
उभी राहा
आणि तुला लांटांवरून आणण्यात येईल.”





मी म्हणते,
“संध्याकाळी मी घरी यावं, अशी माझ्या आईची इच्छा असते. मी तिला सोडून कशी जाऊ?”

त्या हसतात,
नाचतात आणि निघून जातात.




पण मला
त्याहूनही चांगला खेळ माहीत आहे.

मी होईन लाटा आणि तू हो
अनोळखी किनारा. मी लोळत,
लोळत, लोळत तुझ्या मांडीवर
येईन आणि खदखदून हसेन.



आणि आपण दोघी कुठे
आहोत, ते जगातल्या
कुणालाही समजणार नाही!

# रवींद्रनाथ टागोर यांची वंशावळ



रवींद्रनाथ टागोर यांना गुरुदेव म्हटले जात असे. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे वडील देबेंद्रनाथ टागोर संस्कृत पंडित होते. गुरुदेवांचे सुरुवातीचे शिक्षण घरीच झाले. शाळेत, जेव्हा सर्व जण धडे शिकत असत तेव्हा रवींद्रनाथ स्वप्नांच्या रोमांचक जगात सफर करून येत. त्यांनी वयाच्या सातव्या वर्षी पहिली कविता लिहिली. ते सतरा वर्षाचे असताना त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यांचे लिखाण, त्यातील जादू आणि मांडणी, त्यात दडलेल्या भावना आणि ज्या प्रकारे हे सगळं सोप्या शब्दात त्यांनी व्यक्त केलं आहे, ते पाहून थक्क व्हायला होतं. गितांजली या त्यांच्या काव्यसंग्रहाला १९१३ साली नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले.

सुनैना कोएल्हो यांनी अहमदाबाद येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनमधून ॲनिमेशनचा अभ्यास केला आहे आणि आता त्या मुंबईत राहतात. या ठिकाणी त्या टेलिव्हिजनसाठी ॲनिमेशन करतात. जेव्हा त्या चित्र काढत नसतात तेव्हा त्या बहुधा जोपलेल्या असतात, स्वप्न पाहतात, स्वयंपाक करतात किंवा समुद्राच्या बाजूला बसलेल्या असतात. समुद्रात पोहता येईल, इतका तो स्वच्छ असावा अशी त्यांची इच्छा आहे.

## KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

“भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा.” - नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ

“कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो.”
- चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग

“कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते”
- टाइम आउट

“मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे” - पेपरटायगर्स

प्रथम आवृत्ती वर्ष २०२१
कॉपीराइट © कथा, २०११, २०२१
मजकूर कॉपीराइट © रवींद्रनाथ टागोर
इलस्ट्रेशन कॉपीराइट © कथा
ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6

आमचे मिशन : प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!

कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.
या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.





"आय लव्ह रीडिंग लायब्ररी ही पुस्तकांची एक वैशिष्ट्यपूर्ण मालिका आहे. या लायब्ररीच्या माध्यमातून नव्या आणि वाचनाबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असलेल्या वाचकांना सातत्यपूर्ण वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येते. वेगेवगळ्या पातळ्यांवर असलेल्या मुलांच्या अध्ययन गरजांनुसार उत्तम दर्जाचा आणि सुंदर डिझाइन असलेला कंटेन्ट उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भारत आणि जगातील उत्तम साहित्यकृती सादर करण्यात येत आहेत. आमच्या पुस्तकांमध्ये गीता धर्मराजन यांचे स्टोरीपेडॅगॉगीTM (कथाअध्ययनशास्त्र) समाविष्ट करण्यात आले आहे, जे विशेषतः पहिल्या पिढीतील वाचकांमध्ये वाचनाच्या आनंदाचा प्रसार करते, आणि मुलांना मोठ्या कल्पना आणि जादुई जगात घेऊन जाते!
(विचार करा, विचारा, चर्चा करा, कृती करा आणि साध्य करा)."

कथाज होलिस्टिक अर्ली लर्निंग (खेल) प्रयोगशाळेच्या माध्यमातून सरकारी, स्वयंसेवी संस्थांमधील आणि खासगी शाळांमधील शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या F2F (फेस टू फेस) कार्यशाळा असतात आणि त्यांना ऑनलाइन सत्रांची जोड दिलेली असते. या कार्यशाळेत शिक्षकांना, शाळा प्रशासकांना आणि स्वयंसेवकांना रीडिंग टीचर्स प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिक माहितीसाठी 300m@katha.org या ईमेलवर संपर्क साधावा.

ही सर्व आयएलआर पुस्तके

इंडिगो सीरिजमध्ये

मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा






































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

“गोष्टींच्या माध्यमातून बहुविध भारताची ओळख.”
- द पायोनिअर

मुलांसाठी
'कथा'चे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
xxx